**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक -०७/०८/२०२२**

# मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांचे संकल्पनेतुन पोलीसांकरीता रक्त तपासणी शिबीर आयोजित केलेबाबत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय आस्थापनेवरीलपोलीस अधिकारी, अंमलदार यांच्या आरोग्याच्या दृष्टीने वैदयकीय चाचण्या होणे गरजेचे असल्याने मा. पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांचे सकल्पनेतुन आज दिनांक ०७.१०.२०२२ रोजी पोलीस मुख्यालय निगडी येथे हेल्पींग हँड या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजन करण्यात आले

पोलीस अधिकारी अंमलदार यांना सातत्याने अहोरात्र कामकाज करावे लागते त्यांच्या जेवणाच्या वेळा अनिश्चित स्वरुपाच्या असतात. त्यांच्यावर सातत्याने पडणारा कामाचा ताण आणि अनियमित जेवणाच्या व झोपण्याच्या वेळा, पुरेशा विश्रांतीचा अभाव यामुळे पोलीसांच्या आरोग्याच्या दृष्टीने तपासण्या होणेकरीता हेल्पींग हँड या सामाजिक संस्थेच्या वतीने तज्ञ वैदयकीय स्टाफ यांचे मार्फतीने पोलीसांकरीता प्रामुख्याने 1. Electrophresis 2.CA-125 (कॅन्सरसाठी) 3.CBC 4. Lipid Profil (हार्टसाठी) 5.LFT (लिव्हरसाठी) 6.KTF (किडणीसाठी) 7. TSH,T3,T4 (थायरॉडसाठी) इ. वेगवेगळया प्रकारच्या रक्त चाचण्या घेण्यात आल्या.

सदर आरोग्यविषयक शिबीरामध्ये एकुण ३७५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला. मा. सहायक पोलीस आयुक्त प्रशासन श्री. माने सो आणि सहायक पोलीस आयुक्त १ श्री. अमृतकर सो यांनी सदर रक्त चाचण्यांकरीता उपस्थित असणारा तज्ञ वैदयकीय स्टाफ यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले. सदर रक्त तपासणी शिबीरामध्ये श्री. अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, श्री.संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त श्री. काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त यांनीही सहभाग घेतला व सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल वाढविले.

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड